अतारांकित प्रश्नोत्तरांची ११० वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

कोपरगाव (जि.अहमदनगर) तालुक्यातील कालव्यानजीकच्या जमिनी गावतळे व साठवण तलावासाठी देण्याबाबत

(१) २७१०४ (०१-०९-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) तालुक्यातील गोदावरी नदीच्या डाव्या उजव्या कालव्यालगत शेती महामंडळाच्या अनेक ठिकाणी शेकडो एकर जमिनी पडीक आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनी गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी साठवण तलाव, गावतळे,पाझर तलाव व पाणीपुरवठा योजनांसाठी विनामुल्य मिळाव्यात अशी मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२३-०६-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) साठवण तलाव, गावतळे, पाझर तलाव व पाणीपुरवठा योजनांसाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या जमिनी देण्याबाबतची तरतूद महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ मधील कलम २८-१ अअ (३ अ) मध्ये नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्यासह पदवीधारक पशुवैद्यकीय यांच्या प्रलंबित मागण्या पुर्ण करण्याबाबत

(२) ३२४८६ (०७-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद सेवेतील साडेचार हजार पदवीधारक पशुवैद्यकीय यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असल्यामुळे पशुचिकित्सक व्यवसायिक संघटनेने दिनांक १५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास आंदोलन सुरू केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पशुसंवर्धन विभागातील पदवीधारक पशुवैद्यकीय व कर्मचाऱ्यांची शेकडो पदे रिक्त असल्यामुळे पशुधन शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्यासह पदवीधारक पशुवैद्यकीय यांच्या मागण्या पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१) पशुचिकित्सा व्यवसायिक संघटनेने प्रलंबित मागण्यांकरीता दिनांक १०/०६/२०२१ रोजीच्या निवेदनानुसार दिनांक १५/०६/२०२१ पासून ३ टप्प्यांमध्ये आंदोलन सुरु केल्यानंतर दिनांक

०१/०८/२०२१ पासून बेमुदत संपावर जाण्याविषयी विभागास कळविले आहे. या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३/०८/२०२१ रोजी आयोजित बैठकीच्या अनुषंगाने सदर संघटनेने दिनांक ०३/०८/२०२१ रोजीच्या निवेदनानुसार आंदोलन/संप तुर्तास स्थगित करत असलेबाबत विभागास कळविले आहे.
(२) पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यक व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. तथापि पशुवैद्यकिय संस्थामधील रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे सेवा पुरविण्यात येत आहेत, तसेच पशुधन शेतकऱ्यांची व पशुपालकांची कोणतीही गैरसोय होत असलेबाबतच्या कोणत्याही तक्रारी विभागास प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) शासन आदेश दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये एकूण ४२८ पशुधन विकास अधिकारी (गट-अ) यांची विभागात नियुक्ती करण्यात आलेली असून, पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २९८ रिक्त पदे आणि सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गातील ५६ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली असून, भरतीची कार्यवाही सुरू आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्त्रोतांद्वारे २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु असून, सदरहू सुधारीत आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर विहित प्रक्रियेद्वारे गट-क संवर्गातील पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोयनानगर (ता.पाटण, जि.सातारा) येथे राज्य आपत्ती बचाव दल व पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत

(३) ३२५७९ (०७-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयनानगर (ता.पाटण, जि.सातारा) येथे राज्यातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात पावसाळ्यात दरवर्षी पूरपरिस्थिती निर्माण होत असून त्यावेळी मदत कार्यासाठी एनडीआरएफ, पोलीस एसआरपीएफ आदि दलांची आवश्यकता असून लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य आपत्ती बचाव दल आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्यास शासनाने मान्यता दिली असल्याचे दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी कोयनानगर येथील गट/सर्व्हे क्र.२५, २६ व २७ या क्षेत्रातील महसूल विभागाच्या अखत्यारीत असलेली जागा या विभागाकडून गृह विभाग अथवा पोलीस महासंचालक कार्यालयाकडे हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महसूल विभागाकडे करण्याकरिता पोलीस विभागाने पाठपुरावा करावा असे आदेश मा.गृहराज्य मंत्री (ग्रामीण) यांनी सातारा जिल्हा पोलीस प्रशासन व जिल्हाधिकारी, सातारा यांना त्याचवेळी दिले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी गृह मंत्री (ग्रामीण), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील संबंधित महसूल व पोलीस विभागाचे शासकीय अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत एका महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी राज्य आपत्ती बचाव दल आणि पोलीस प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४) कोयनानगर (ता.पाटण, जि. सातारा) येथे राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल व पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने महसुल विभागाचे नावे कोयनानगर , तालुका पाटण, जिल्हा सातारा येथे असलेली गट क्र. २५,२६,२७,२९,३१,३२,३३, ३४,३५ मधील सुमारे ४१.७७ हेक्टर जागा पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या नावे वर्ग करण्यासंदर्भातील प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडून महसुल व वन विभागास सादर करण्यात आला असून त्या विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
सदर जमिन हस्तांतरणाच्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर कोयनानगर येथे स्थापन करण्यात येणा-या राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल/पोलीस प्रशिक्षण केंद्राबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई वाहतुक विभागातील क्रेनच्या गैरकारभाराबाबत

(४) ३२८९० (०७-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलातील मुख्य नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले सुनील टोके यांनी ठाणे आणि नवी मुंबई वाहतुक विभागातील क्रेनच्या गैरकारभाराचा आरोप व्हिडीओमार्फत केल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सुनील टोके यांनी मुख्यमंत्री व गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच पोलीस आयुक्त, ठाणे व नवी मुंबई यांच्याकडे लेखी पुराव्यासह पत्रव्यवहार केले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी सुनील टोके यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात येत असल्याचा आरोपही करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) होय, खरे आहे.
(२) श्री.सुनील टोके, यांनी याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.गृह मंत्री तसेच पोलीस आयुक्त,ठाणे व नवी मुंबई यांचेकडे पत्र व्यवहार केला आहे.
(३) होय खरे आहे.
(४) अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,ठाणे शहर यांनी सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधीत क्रेनचे मालक,पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा,ठाणे शहर व इतर साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले आहेत. सदर संपूर्ण चौकशीत श्री. टोके यांनी त्यांचे तक्रार अर्जात नमुद केलेल्या मुद्द्यांनुसार काही तथ्य नसल्याचे निदर्शनास आल्याबाबतचा अहवाल दि. ११.१.२०२२ रोजी सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर स्फोटकाची गाडी तसेच मनसुख हिरेनच्या हत्येबाबत

(५) ३२८९५ (१०-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर स्फोटकाची गाडी व मनसुख हिरेनच्या हत्येबाबत चौकशी सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१), (२) व (३) उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या ॲटिलिया निवासस्थानासमोर स्फोटक पदार्थ ठेवलेली गाडी मिळून आल्याबाबत गांवदेवी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ३५/२०२१, कलम २८६, ४६५, ४७३, ५०६ (२), १२० (ब) भा.दं.वि. सह कलम ४ (अ) (ब) (१) भारतीय स्फोटक अधिनियम – १९०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे गु.र.क्र.४०/२०२१ अन्वये नोंदवून या प्रकरणाचा तपास सुरु करण्यात आला. सदर गुन्हा गृह विभागाच्या पत्र क्रमांक संकीर्ण १४२१/प्र.क्र.२६१/पोल ११, दि.०६/०३/२०२१ अन्वये पुढील तपासाकरीता दहशतवाद विरोधी पथक, मुंबई यांच्याकडे सोपविण्यात आला होता. सदरच्या गुन्ह्याचा तपास राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण कायदा २००८ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय अन्वेषण अभिकरण (NIA) ने दि.०८/०३/२०२१ रोजी तपासाकरीता घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

(६) ३३३३२ (०७-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील पशुवैद्यकिय दवाखान्यात मोठया प्रमाणात पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुवैद्यकिय दवाखान्यात पदे रिक्त असल्यामुळे वैद्यकिय विभागाच्या कामावर परिणाम होत असून सदरहू पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त जिल्हयातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१) व २) अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पशुसंवर्धन विभागातील संवर्गनिहाय मंजूर पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

पद	मंजूर	भरलेली	रिक्त
सहायक आयुक्त पशुसंवर्धन	०९	०२	०७
पशुधन विकास अधिकारी	४२	२१	१२
सहायक पशुधन विकास अधिकारी	२१	२०	०१
पशुधन पर्यवेक्षक	१५९	९६	६३
एकूण	**२३१**	**१४८**	**८३**

रत्नागिरी जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील उक्त पदे नियतकालीक बदल्या, पदोन्नती आणि नियत वयोमानाने सेवानिवृत्ती इ. कारणांमुळे रिक्त झालेली आहेत. सदरहू रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना/पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यास त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. वित्त

विभाग शासन निर्णय दि. ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु असून, सदरहू सुधारीत आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर विहित प्रक्रियेद्वारे गट-क संवर्गातील पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

(७) ३३६३१ (०६-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान परतीच्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कापणी पश्चात शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा मिळण्याची तरतुद असताना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे फार मोठे नुकसान झाले त्यापैकी बहुतेक शेतकऱ्यांनी पिक विमा भरलेला असताना सुध्दा ते पिक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांना ग्रामीण भागात ऑनलाईन तक्रारी करण्यासाठी अडचणी येतात असे शेतकरी ऑफलाईन तक्रार करु शकतात व प्राप्त झालेल्या तक्रारी नंतर १० दिवसांमध्ये विमा कंपनीच्या संयुक्त समिती मार्फत नुकसानीचे सर्वेक्षण करावे परंतु ते कंपनीला शक्य न झाल्यास महसूल व कृषी विभागामार्फत झालेले सर्वेक्षण ग्राह्य धरुन कंपनीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे बंधनकारक असल्याचे कृषी आयुक्त, महाराष्ट्र शासन, पुणे यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास विमा कंपन्यांना दिलेल्या पत्रामध्ये स्पष्ट नमुद असताना संबंधीत विमा कंपन्यांनी आजही अनेक शेतकऱ्यांना विमा पासून वंचित ठेवल्याचे आढळून आले , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांकडून ऑफलाईन तक्रारी न घेता ऑनलाईन तक्रारी केल्या नाहीत या कारणास्तव शेतकऱ्यांना विमा संरक्षण न देणाऱ्या विमा कंपनीवर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) खरीप २०२० हंगामात पिक विमा योजनेमध्ये सहभागी शेतकरी हे कोविड-१९ ची लाक्षणिक स्थिती, त्याच बरोबर शेतकऱ्यांकडे स्मार्ट फोन नसणे, इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या समस्या, टोल फ्री क्रमांक न लागणे, पिक विमा ॲप वर सूचना न देता येणे. शासकीय तसेच विमा कंपनीची कार्यालय पूर्ण क्षमतेने चालू नसणे. प्रवास विषयक शासनाच्या निर्बंध अशा विविध कारणांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही विमा कंपन्यांना सूचना देऊ शकले नाहीत. यामुळे नुकसान होऊनही अनेक पात्र शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहीले आहेत. त्या अनुषंगाने NDRF चे पंचनामे गृहीत धरुन नुकसान भरपाई निश्चित करण्याबाबत सर्व विमा कंपन्यांना आदेशित करुन केंद्र शासनास दिनांक १३ जुलै, २०२१ व दि. ०८ ऑक्टोबर, २०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात दि.१७.१२.२०२१ रोजी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत विमा कंपन्यांना राज्य शासनाच्या भुमिकेनुसार शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती अंतर्गंत पंचनामे गृहित धरून नुकसान भरपाई अदा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सदर योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येत असल्याने याअनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी विषय हा शालेय शिक्षणामध्ये समाविष्ट करण्याबाबत

(८) ३३९६४ (१७-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेती करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे शिक्षण-प्रशिक्षण दिले जात नसून पारंपारिक पध्दतीनेच शेती केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाने निर्णय निर्गमित करून राज्यातील शाळांत १ ली ते १० वी पर्यत शेती शिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-०६-२०२२) :(१) हे खरे नाही.

राज्यातील चारही कृषि विद्यापिठांमार्फत कृषि विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना नवनवीन कृषि उच्च तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षण दिले जाते. विद्यापिठांनी विकसित केलेले तंत्रज्ञान प्रदर्शने, प्रात्याक्षिके,मेळावे,प्रकाशने, शिवार फेरी व प्रशिक्षणाद्वारे राज्याच्या विस्तार शिक्षण यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले जाते. कृषि विद्यापीठांतर्गत कृषि प्रशिक्षणाचे कार्यक्रम कृषि विज्ञान केंद्रांमार्फत आयोजित केले जात असून, शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी विद्यापीठातील संशोधकांपर्यंत पोहोचवून शेतकऱ्यांना आवश्यक असणारे संशोधन कृषि विद्यापीठात करण्याचे काम कृषि विज्ञान केंद्रामार्फत करण्यात येते. सद्यस्थितीत राज्यात ४७ कृषि विज्ञान केंद्रे कार्यरत असून, या केंद्रांमार्फत शेतीविषयक अद्यावत तंत्रज्ञान प्रात्यक्षिक/प्रशिक्षणाद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

(२) मा.मंत्री (शालेय शिक्षण) व मा.मंत्री (कृषि) यांच्या दि.२५/०८/२०२१ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीतील निर्देशानुसार शेती विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे दोन तज्ञ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यातील दोन तज्ञ व महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांचे दोन तज्ञ अशा एकूण ६ सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीने सादर केलेला अहवाल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने दि.२९/१०/२०२१ अन्वये शालेय शिक्षण विभागास सादर केला आहे. त्यानुसार प्रस्ताव शालेय शिक्षण व कृषि विभागस्तरावर विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी (मुंबई) येथील मेघवाडी पोलीस ठाणे, जोगेश्वरी पोलीस ठाणे व आरे पोलीस ठाणे या तीनही पोलीस ठाण्यांच्या इमारतींच्या विकासाबाबत

(९) ३५३७३ (१०-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी पूर्व (मुंबई) येथील उपनगरात संवेदनशील क्षेत्र असल्याचे पोलीस प्रशासनाच्या दफ्तरी नोंद असून विधानसभा क्षेत्रात मेघवाडी पोलीस ठाणे, जोगेश्वरी पोलीस ठाणे व आरे पोलीस ठाणे ही तीन पोलीस ठाणे येत असून या तीनही पोलीस ठाण्याच्या इमारतींच्या विकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनाकडे माहे एप्रिल, २०११ मध्ये वा त्यादरम्यान पाठपुरावा केला असून यासंदर्भात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तसेच मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पत्रान्वये विनंती अर्ज सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मेघवाडी पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीसाठी प्रस्तावित व राखीव जागा गृहविभाग प्रशासन ताब्यात

घेवून मंजूर झालेल्या निधीतून या नवीन इमारतीचे काम सुरु होण्यास विलंब होत असल्याने आजही भाड्याच्या जागेत कार्यरत असून या क्षेत्रातील जोगेश्वरी पोलीस ठाणे हे देखील सद्य:स्थितीत भाड्याच्या जागेत सुरु असून पावसाळयात या पोलीस स्थानकातील कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आरे पोलिस स्थानक हे आरे दुग्ध व्यवसाय विभागाच्या मालकीच्या इमारतीमध्ये कार्यान्वित असून या इमारतीची आजवर कोणतीच देखभाल दुरुस्ती न केल्याने ही इमारत धोकादायक झाली असून मोडकळीस आली असून सदरहू इमारतीचे बांधकाम हे जवळपास ६० ते ७० वर्षे जुने असल्याने या इमारतीच्या भिंतीस काही ठिकाणी तडे जावून छताचा काही भाग कोसळलेला आहे तसेच पावसाळयात छतामधून गळणारे पाण्यामुळे स्थानकातील संगणक, महत्वाची कागदपत्रे तसेच अन्य सामुग्रीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त नवीन इमारतीकरीता आरे प्रशासनाकडील जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जमीन हस्तांतरणाबाबतची सद्य:स्थिती काय आहे, अद्याप जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यास, या कामी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व या विलंबास जबाबदार असणारे दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे, तसेच सदरहू जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन सदरहू ठिकाणी नवीन इमारत बांधण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) तसेच सदरहू पोलिस स्थानकाच्या सध्य:स्थितीतील इमारतींची तातडीने दुरुस्ती करुन आवश्यक पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, प्रसाधन गृह, विश्रांती गृहांची दुरुस्ती, रंगकाम तातडीने करणेबाबत गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त तीनही पोलीस स्थानकांच्या इमारतींचे बांधकाम तातडीने करुन मुलभूत सुविधा उपलब्ध करुन आवश्यक निधीची तातडीने उपलब्धता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-०६-२०२२) :(१) होय.

(२) होय. हे अंशत: खरे आहे.

मेघवाडी पोलीस ठाणे भाडेतत्वावरील जागेत कार्यान्वीत नसून पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे मालकीच्या इमारत क्र.६, मेघवाडी पोलीस वसाहत, मुंबई येथील निवासी सदनिकांमध्ये कार्यान्वीत आहे.

जोगेश्वरी पोलीस ठाणे न.भु.क्र.८५ व ८६, मौजे मजास, ता.अंधेरी येथील खाजगी भूखंडावर असलेल्या बैठया चाळीमध्ये भाडेतत्वावर कार्यान्वीत आहे.

(३) व (४) होय.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२८.१२.२०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये आरे पोलीस ठाणेकरिता इमारत बांधणेकरिता मौजे आरे, सर्व्हे क्र.१अे, न.भू.क्र.४ येथील ५ एकर (२०,२३४.२८चौ.मी.) जागा पोलीस विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. आरे पोलीस ठाणेसाठी मागणी करण्यात आलेले क्षेत्र राखीव वन क्षेत्रात समाविष्ट असल्यामुळे पोलीस ठाणेसाठी आवश्यक असलेले ५ एकर क्षेत्र वगळून उर्वरित जागेचा ताबा वन विभागाकडे देणेबाबत कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१०/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव (पूर्व), मुंबई यांना कळविले आहे. तसेच दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी शासन निर्णयान्वये सदर वगळण्यात आलेले सर्व्हे क्र.१अे, न.भू.क्र.४, मौजे आरे, ता.बोरीवली येथील ५ एकर क्षेत्र आरे पोलिस ठाण्याच्या नविन प्रशासकीय इमारतीकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास मान्यता दिली असून इमारतीच्या बांधकामाकरिता आवश्यक ती परवानगी मिळणेबाबत संबंधित प्राधिकरणाकडे पाठपुरावा /पत्रव्यवहार करणेसाठी सूचना देण्यात आलेल्या आहे. त्यानुसार जागेचा ताबा पोलीस विभागास देणेबाबत, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दि.१३/०९/२०२१ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना विनंती केली असून नगर भूमापन अधिकारी, मालाड, मुंबई यांचे कार्यालयामार्फत जागेची सिमांकन मोजणी करुन घेणेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आरे पोलीस ठाणे यांना कळविले आहे. तसेच पोलीस ठाणे इमारतीच्या बांधकामाकरिता आवश्यक ती परवानगी मिळणेबाबत संबंधित प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार करण्यासंदर्भात पोलीस उप

आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई यांना सूचित करण्यात आले आहे.
सदर जागेचा ताबा मिळाल्यानंतर त्या ठिकाणी नवी इमारत बांधण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल.
(५) व (६) होय.
(अ) मेघवाडी पोलीस ठाणेकरिता न.भु.क्र.३, जोगेश्वरी (पूर्व), मौजे- इस्मालिया, ता.अंधेरी, मुंबई येथील २०२८.८चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेवर नवीन इमारत बांधणेसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा कार्यालयाकडून वाकोला, मेघवाडी, मालाड व गोरेगाव या चार पोलीस ठाणेच्या इमारती बांधकामाकरीता रु.८,६९,१४,०००/- इतका निधी मंजूर असून त्यापैकी मेघवाडी पोलीस ठाणेकरिता रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी) दि.१५/७/२०२० रोजी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळास वर्ग केला आहे. मेघवाडी पोलीस ठाणेकरिता दि.२५/१०/२०२१ रोजी रु.५,९७,८२,०८३/- (रुपये पाच कोटी सत्याण्णव लाख ब्याऐंशी हजार त्र्याऐंशी फक्त) असा एकूण प्राप्त झालेला रुपये ७,९७,८२,०८३/- (रुपये सात कोटी सत्याण्णव लाख ब्याऐंशी हजार त्र्याऐंशी फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळास वर्ग केला आहे. प्रस्तावित इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी, मुंबई यांचेमार्फत करण्यात येणार असून इमारतीच्या आराखडयास बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून मंजुरी अद्याप प्राप्त झालेली नाही.
(ब) जोगेश्वरी पोलीस ठाणे, मौजे मजास, ता.अंधेरी येथील न.भु.क्र.८५ व ८६ येथील भूखंडावरील बैठया चाळीमध्ये कार्यान्वीत असून दोन्ही भूखंड विकासक मेसर्स कोईल डेव्हलपर्स, मुंबई यांच्या मालकीचे आहेत. या भूखंडावरील ५३४.४२ चौ.मी.क्षेत्रफळ जोगेश्वरी पोलीस ठाणे करिता आरक्षित असल्याने, विकासक यांनी तळ+चार मजले इमारत (१०,००० चौ.फुट चटई क्षेत्रफळ) विनामुल्य बांधून देणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. याबाबत गृहनिर्माण विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.
(क) आरे पोलीस ठाणेकरिता इमारत बांधणेसाठी दि.२८/१२/२०२० रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मौजे आरे, सर्व्हे क्र.१/अे, न.भू.क्र.४ येथील ५ एकर (२०,२३४.२८चौ.मी.) जागा पोलीस विभागास उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश दिले आहेत. अद्याप जागा पोलीस विभागास हस्तांतरीत झालेली नाही. सदर जागेचा ताबा मिळाल्यानंतर त्या ठिकाणी नवी इमारत बांधण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल.

उमरेडसह नागपूर येथील खेळांची मैदाने खेळाडूंसाठी पूर्णवेळ खुली करण्याबाबत

(१०) ३५३८७ (०७-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेडसह नागपूर येथील खेळांची मैदाने काही दिवसांपूर्वी कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे खेळाडूंसाठी खुली करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त खेळाकरिता वेळेचे बंधन घातल्याने खेळाडूंना सराव करण्यास अडचण येत असून खेळाडूंमध्ये निराशा येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी खेळाडूंसाठी मैदाने पूर्णवेळ खुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१) कोरोनाच्या प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर खेळांची मैदाने टप्याटप्याने खुली करण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.
(३) महसूल व वन,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाच्या दिनांक ३१ मार्च,२०२२ च्या शासन आदेशान्वये

सर्व मैदाने खेळाडूंसाठी पूर्ण वेळ खुली करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पोलिस उपनिरिक्षक विभागीय मर्यादीत परिक्षा रद्द करुन सेवाज्येष्ठता पदोन्नतीद्वारे जागा भरण्याचे प्रस्तावित केल्याबाबत

(११) ३५५२६ (०७-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील हजारो पोलिस कर्मचारी काही वर्षे अभ्यास करुन पोलिस उपनिरिक्षक होण्यासाठी परिश्रम करत असताना पोलिस महासंचालक याद्वारे विभागीय मर्यादीत पोलिस उपनिरिक्षक परिक्षा रद्द करुन त्याऐवजी सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीद्वारे जागा भरण्याबाबतचा प्रस्ताव प्रस्तावित केला असल्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०६-२०२२) : (१) व (२) होय
गृह विभाग, शासन निर्णय दि.२५.०२.२०२२ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य कार्यालयाच्या अधिनस्त पोलीस घटकांमधील अंमलदार संवर्गासाठी पदोन्नतीच्या संधीमध्ये वाढ करण्याबाबत तसेच पोलीस शिपाई संवर्गात भरती झालेल्या साधारणपणे प्रत्येक पोलीस शिपायास त्याच्या सेवा कालावधीत किमान पोलीस उपनिरीक्षक या पदावरुन सेवानिवृत्त होता यावे, या दृष्टीकोणातून धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मर्यादीत विभागीय परीक्षेद्वारे भरण्यात येणा-या २५% पदांचा कोटा रद्द करण्यात आला असून पदोन्नतीचा कोटा ५०% करण्यात आला आहे. तथापि, डिसेंबर २०२३ पर्यंत पोलीस उपनिरीक्षकांच्या मर्यादीत विभागीय परिक्षेचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील अनभिज्ञ रोगाच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिकाची नुकसान भरपाईची रक्कम तात्काळ शेतक-यांना मिळण्याबाबत

(१२) ३६१८३ (०७-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील खरीप हंगाम सन २०२०-२१ या कालावधी मध्ये सोयाबीन पिकांवर अनभिज्ञ रोगाच्या प्रादुर्भावामुळे शेतक-यांची पिके नष्ट होवून शंभर टक्के नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागाने तात्काळ पाहणी करुन पंचनामे व अहवाल शासनास सादर केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर जिल्हयातील अनभिज्ञ रोगाच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिकांच्या नुकसान भरपाईची रक्कम शेतक-यांना तात्काळ मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
सोयाबीन पिकावर मुळकुज व पिवळा मोझाइक या रोगाचा त्याचप्रमाणे खोडमाशी व चक्रीभुंगा या किडींचा प्रादुर्भाव झाल्याने सोयाबीन पिकाचे काही प्रमाणात नुकसान झाल्याचे आढळले. नागपूर जिल्ह्यात सोयाबीन पिकावरील किड व रोगाच्या प्रादुर्भावामुळे ६८,९६८.२५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले.

(२) हे खरे नाही.
(३) सोयाबीन व इतर पिकासाठी किड/रोगाच्या नियंत्रणासाठी कृषि विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी / कर्मचारी मार्फत ५३५ ॲडवायजरी, १०५०० घडीपत्रिका, शात्रज्ञांच्या समवेत प्रक्षेत्रावर भेटी व ७८० गावसभा घेऊन किड व रोग नियंत्रणाबाबत व्यापक स्वरूपात प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली.

किडरोगामुळे नुकसान ही बाब मदतीसाठी निश्चित केलेल्या निकषाबाहेरील असल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आर्णी (जि.यवतमाळ) येथील तहसील कार्यालयातील पुरवठा व संजय गांधी निराधार या विभागामधील पदे तातडीने भरण्याबाबत

(१३) ३६४४२ (१०-०१-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथील तहसील कार्यालयातील पुरवठा आणि संजय गांधी निराधार या दोन्ही विभागांच्या आकृतिबंधातील पदांना मान्यता मिळाली नसल्यामुळे इतर कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, संजय गांधी निराधार विभागात १ नायब तहसीलदार, १ अव्वल कारकून, ३ महसूल सहायक व १ शिपायाची आवश्यकता असुन पुरवठा विभागात पुरवठा निरिक्षक, अन्न पुरवठा निरिक्षक,अव्वल कारकून, कार्ड लिपिक, परमिट लिपिक व एक शिपाई इत्यादींची आवश्यकता आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदांमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामांचा ताण येत असल्यामुळे तहसील कार्यालयातील पुरवठा व संजय गांधी निराधार या विभागांमधील सदरहू पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१६-०६-२०२२) : (१) होय,

आकृतीबंधातील पदांना मान्यता नसल्याने संजय गांधी निराधार व पुरवठा या विभागाची पदे रिक्त आहेत परंतु नागरिकांची कामे महसूल विभागातील इतर कर्मचाऱ्यांकडे देण्यात आलेले असून नागरिकांना आवश्यक सेवा पुरविण्यात येत आहे.
(२) होय.
(३) सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त असून कार्यवाहीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समितीने शासनाला सादर केलेला अहवाल

(१४) ३७९५४ (०७-०४-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील विशेषतः रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील बेदखल कुळांच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरिता विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने याबाबतचा अहवाल दिनांक १९ जानेवारी,२०१७ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये शासनाला सादर केला , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांच्या विविध कलमांत सुधारणा करणे, पीक पाहणीच्या

नोंदी अदयावत करणे, कुळ कायदयांच्या प्रकरणांतील दावे चालविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे, सर्व प्रलंबित दावे एका वर्षात निकाली काढण्यासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करणे आदी शिफारशी असलेला समितीचा अहवाल स्वीकृतीसाठी शासनाला सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवाल स्वीकृतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२२) : (१), (२) व (३) या विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १२/९/२०१४ अन्वये, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील बेदखल कुळांच्या समस्यांचे सर्वंकष अभ्यासाकरिता विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. यासंदर्भात विभागीय आयुक्त यांच्या दिनांक १९/१/२०१७ च्या पत्रान्वये, सदर समितीने अहवाल शासनास सादर केला. सदर अहवालातील शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत :-
१.महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांच्या विविध कलमांत सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.
२.पीकपाहणीच्या नोंदी अद्ययावत ठेवणे.
३.कुळकायदयांच्या प्रकरणांतील दावे चालविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
४.सर्व प्रलंबित दावे एक वर्षात निकाली काढण्यासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करणे.
५.कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत यापूर्वी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींप्रमाणे बेदखल कुळांच्या घरठाणांच्या जागांबाबत शिफारस आहे.
सदर समितीचा अहवाल स्वीकृतीसाठी शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा गत पाच वर्षापासून घेण्यास विलंब होत असल्याबाबत

(१५) ३८१८३ (१२-०४-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागील पाच वर्षांपासून पोलीस खात्यांतर्गत पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदाची परीक्षाही घेण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या ५ वर्षांत पोलीस शिपाई आणि अंमलदारांचे पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न अपुर्ण राहिल्याने पोलीस खात्यांतर्गत परीक्षा देणाऱ्या २२०० उमेदवारांनाही सामावून घेण्याची मागणी राज्यातील पोलीस शिपाई आणि पोलीस अंमलदारांनी शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळाकरिता सन २०१६ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेतील अतिरिक्त ६३६ उमेदवारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-०६-२०२२) : (१) व (२) सन २०१७ पर्यंत पोलीस उप निरीक्षक पदासाठीची मर्यादीत विभागीय परीक्षा नियमीतपणे घेण्यात आल्या आहेत. सन २०१८ ते सन २०२० या कालावधीत मर्यादीत विभागीय परिक्षेच्या कोट्यातील पदे रिक्त नसल्याने सदर वर्षामध्ये परिक्षा घेण्यात आलेल्या नाहीत.

सन २०२१ वर्षासाठी २५० पदांसाठी मर्यादीत विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षेसंदर्भात दि.१०.०२.२०२२ रोजी शासन परिपत्रक निर्गमीत करण्यात आले आहे व त्यानुसार दि.१६.०४.२०२२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पूर्व परीक्षा घेण्यात आली आहे.
(३) पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय परीक्षा-२०१६ मधील शिफारस यादी व्यतिरिक्त ६३६ उमेदवारांना सामावून घेण्याबाबतचा दि.२२.०४.२०१९ रोजीचा शासन निर्णय मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठाने

मुळ अर्ज क्र.७२२/२०१९ प्रकरणी दि.०४.०३.२०२२ रोजी दिलेल्या आदेशान्वये रद्द केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेनंतर पोलीस अधिकारी व शिपाई यांचे लाचखोरी व गैरव्यवहाराचे सत्र सुरु झाल्याबाबत

(१६) ३८१९० (१२-०४-२०२२). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या महामारीच्या पहिल्या लाटेनंतर अनलॉकचा टप्पा सुरु होताच गृह विभागातील पोलीस अधिकारी व शिपाई यांनी लाचखोरी व गैरव्यवहार सुरु झाल्याने अहमदनगर जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावून ३५ कारवाया केल्या असून ४७ लाचखोरांना माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ताब्यात घेतले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवायांमध्ये गृह खात्याचे वर्ग एक ४, वर्ग दोन ६, वर्ग तीन २५ व इतर १२ जणांचा समावेश असून सन २०२० या कालावधीच्या तुलनेत या वर्षात आकडा दोन टक्क्यांने वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार लाचखोर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-०६-२०२२) : (१) अहमदनगर जिल्हयात माहे जानेवारी ते डिसेंबर,२०२१ या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावून ३५ कारवाया केल्या असून त्यात ४७ लोकसेवक आरोपी यांना ताब्यात घेतले आहे. एकूण ३५ सापळा कारवायांपैकी पोलीस अधिकारी व शिपाई यांचेवर १२ सापळा कारवाया करण्यात आल्या असून १६ आरोपी लोकसेवक व खाजगी व्यक्ती यांना ताब्यात घेतले आहे.
(२) अहमदनगर जिल्हयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे जानेवारी ते डिसेंबर,२०२१ या कालावधीत केलेल्या कारवाईमध्ये गृह विभागाच्या वर्ग ३ चे १५ व खाजगी व्यक्ती १ अशा एकूण १६ व्यक्तींचा समावेश आहे. सन २०२० मध्ये ही संख्या एकूण १० इतकी होती.
(३) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सापळा प्रकरणातील आरोपी लोकसेवकांविरुध्द कारवाई पूर्ण होऊन त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर त्वरीत संबधित लोकसेवकांच्या प्रशासकीय विभागास कळविण्यात येते. त्यानुसार प्रशासकीय विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पात कंत्राटी लेखापालांकरिता वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत.

(१७) ३८२४३ (०१-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, पुणे मार्फत विविध कंत्राटी पदे भरण्याकरिता अर्ज मागविण्यात येत असून कंत्राटी लेखापाल या पदाकरिता ४० वर्षे वयोमर्यादा देण्यात आली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पामध्ये अनेक कंत्राटी लेखापालांचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील असल्याने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पामध्ये काम केलेले कंत्राटी लेखापाल, मा. बाळासाहेब

ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पात अर्ज करू शकणार नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पात कंत्राटी लेखापालांकरिता वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (१५-०६-२०२२) : (१) होय
(२) महाराष्ट्र स्पर्धाक्षम विकास प्रकल्प व मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प हे दोन स्वतंत्र प्रकल्प असून मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पासाठीचा कत्रांटी पदांची वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्रकल्पाची गरज विचारात घेऊन विहित करण्यात आली आहे. त्याचा अन्य प्रकल्पाशी संबंध जोडणे संयुक्तिक ठरणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीकडे दुर्लक्ष केल्याबाबत

(१८) ३९३४३ (०७-०४-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना विविध योजनांचा थेट लाभ देण्यासाठी १५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास ई-पीक पाहणी योजना सुरु केली असून सदर ॲपमध्ये माहिती भरताना तांत्रिक अडचणी येत आहेत तसेच बहुतांश शेतकऱ्यांकडे मोबाईल नसल्यामुळे व्यत्यय येत आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, राज्यभरात एकाच प्रकारच्या पिकासाठी एकच संकेतांक निश्चित करण्यात येत असल्याने गाव, तालुका, जिल्हा विभागनिहाय कोणत्या पिकाखाली किती क्षेत्र आहे याची निश्चित आकडेवारी ई-पीक पाहणी ॲपमुळे सहज उपलब्ध होणार असल्याने आधारभूत किमतीवर धान, कापूस, हरभरा, तूर खरेदी आदी योजनांसाठी पीकनिहाय लागवडीचे क्षेत्र व उत्पन्नाचा अचूक अंदाज काढण्याकरीता पीककर्ज, पीकविमा भरणे किंवा नुकसान भरपाई अदा करता येईल असे शासनाकडून सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ९६ लाख १९ हजार ५३८ पैकी ६६ लाख ०६ हजार ८९६ शेतकरी पिकांचे फोटो व माहिती अपलोड केल्याने प्रत्यक्षात ३० लाख १२ हजार ६४२ शेतकऱ्यांनी माहितीच अपलोड केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शेतकऱ्यांकडे ॲण्ड्रॉईड फोन नसल्यामुळे त्यांची माहिती अपलोड केलेली नाही तसेच उर्वरीत शेतकऱ्यांची शासनाने ई-पीक पाहणी नोंद घेण्याबाबत व सक्तीची न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२२) : (१) होय. हे खरे आहे.

पीकपेरणीची माहिती भ्रमणध्वनी वरील ॲपद्वारा (Mobile App) गा.न.नं.१२ मध्ये नोंदविण्यासाठी स्वत: शेतकऱ्यांनी उपलब्ध करुन देण्याचा "ई पीक पहाणी" कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दि.३०/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. सदर "ई पीक पहाणी" हा कार्यक्रम टाटा ट्रस्टच्या सहकार्याने / मदतीने, त्यांनी विकसित केलेल्या आज्ञावलीद्वारे दिनांक १५/०८/२०२१ पासून संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे.

ग्रामीण भागामध्ये काही गावामध्ये इंटरनेट सेवेसंबधी अडचणी आहेत. तथापि ई-पीक पाहणी हे मोबाईल ॲप डाऊनलोड करून फक्त एकदा खातेदार यांना नोंदणी करण्यासाठी आणि नोंदणी केलेली पीक पाहणीची माहिती फोटोसह अपलोड करण्यासाठी इंटरनेटची आवश्यकता असते. प्रत्यक्ष शेतात जावून ई-पीक पाहणी नोंदविण्याची प्रक्रिया आणि

अक्षांश रेखांशासह फोटो घेण्याची प्रक्रिया ऑफलाईन मध्ये चालते. त्यासाठी इंटरनेटची आवश्यकता भासत नाही.
(२) व (३) होय. हे खरे आहे.
काही शेतकरी खातेदार यांनी मोबाईल ॲपवर उशिराने नोंदणी तर केली मात्र शेतातील पीक काढणी झाली असल्याने किंवा कोणत्याही तांत्रिक अडचणीमुळे पिकांची माहिती अपलोड केलेली नाही.
(४) हे खरे नाही.
शेतकऱ्यांना काही अडचणीमुळे ई-पीक पाहणी करता आली नाही तर तलाठी स्तरावरून पुर्वीप्रमाणे पीक पेऱ्याची नोंद करण्याची सुविधा उपलब्ध आहे.
तथापि कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अचुक पिकांच्या नोंदी गाव नमुना १२ मध्ये होणे आवश्यक असल्याने, शेतकरी यांनी स्वत: ई-पीक पाहणी द्वारे पीक पेरा नोंदविणे शेतकरी हिताचे आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यातील तहसिल कार्यालयात समितींची स्थापना झाली नसल्याबाबत

(१९) ३९४७८ (०७-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यातील तहसिल कार्यालयात नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळावा याकरीता समित्यांची स्थापना करण्यात येते, त्या समित्या अद्यापही स्थापन न झाल्याने नागरिकांना अनेक लाभांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगाखेड तालुक्यातील तहसिल कार्यालयातील समित्या अद्याप स्थापन न होण्याची कारणे काय आहेत तसेच तातडीने या समित्या स्थापन करून नागरिकांना योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२२) : (१), (२) व (३) तहसिल कार्यालय, गंगाखेड येथे ज्या समित्यामध्ये शासकिय यंत्रणा समाविष्ठ आहेत. त्या समितीची बैठक शासन तरतूदीनुसार नियोजित बैठका घेण्यात येतात.ज्या समितीवर मा. पालकमंत्री महोदय यांचेकडून अशासकीय सदस्यांच्या नावाची शिफारस करण्यात येते. त्या समितीसाठी मा. पालकमंत्री महोदय यांचेकडून अशासकीय सदस्यांच्या शिफारसी प्राप्त होताच सदस्याच्या समित्या गठित करण्यात येतील.
मात्र, ज्या-ज्या समित्यामध्ये अशासकीय सदस्यांच्या समावेश नाही, त्या समित्या कार्यरत आहेत. उर्वरित तालूकास्तरीय सर्व समित्या गठित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
विविध शासकीय योजनांचा लाभ तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार देण्यात येत आहेत.

विटा (ता.खानापूर जि.सांगली) येथील मोजणी कार्यालयात पूर्णवेळ भूमि उपअधिक्षकांचे पद गेल्या अनेक महिन्यापासून रिक्त असल्याबाबत

(२०) ३९८०५ (०१-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विटा (ता.खानापूर जि.सांगली) येथील मोजणी कार्यालयात पूर्णवेळ भूमि उपअधिक्षकांचे पद अनेक महिन्यापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२). असल्यास, भूमि उपअधिक्षकांचे पद रिक्त असण्याची कारणे काय आहेत,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (२१-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) उप अधीक्षक भूमि अभिलेख खानापूर मु.विटा या पदावर कार्यरत अधिकाऱ्याची जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख या गट-अ संवर्गात पदोन्नती झालेने सदरचे पद दिनांक ०६/०९/२०२१ पासून रिक्त असुन सदर पदाचा अतिरिक्त पदभार उप अधीक्षक भूमि अभिलेख तासगांव यांचेकडे सोपविणेत आलेला आहे.

भूमि अभिलेख विभागातील उप अधीक्षक भूमि अभिलेख या गट-ब संवर्गातील सरळसेवेने व पदोन्नतीने पदे भरली जातात. सरळसेवेच्या रिक्त पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करणेत आलेले आहे. तसेच पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

खानापुर पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

(२१) ३९८३५ (०७-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि. सांगली) तालुक्यातील पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागातील १८ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) :(१) जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत खानापूर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील संवर्गनिहाय पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

पद	मंजूर	भरलेली	रिक्त
पशुधन विकास अधिकारी	०९	०४	०५
सहायक पशुधन विकास अधिकारी	०२	०२	००
पशुधन पर्यवेक्षक	०६	०५	०१
व्रणोपचारक	०७	०४	०३
परिचर	१४	०४	१०
एकूण	**३८**	**१९**	**१९**

पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यास त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. वित्त विभाग शासन निर्णय दि. ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात

२६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु असून, सदरहू सुधारीत आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर विहित प्रक्रियेद्वारे गट-क संवर्गातील पदे भरण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यातील माडग्याळ मेंढीचे उगमस्थान निश्चित करण्याबाबत

(२२) ४००४२ (०१-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील माडग्याळ मेंढी हे जतचे वैभव समजले जात असून या मेंढीने तिच्या अंगभूत सौंदर्याने जगातील पशुपालक, मेंढपाळ यांनी शेतकरी आणि प्राणीमित्रांना भूरळ घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मेंढीचे उगमस्थान कुलाळवाडी, सिध्दनाथ आहे, हे सिध्द करण्यासाठी येथील मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुशंगाने मेंढीचे उगमस्थान निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत सन २००३ मध्ये राज्यस्तरीय समितीमार्फत प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले. त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत माडग्याळ मेंढयांचा विकास, संवर्धन व प्रसार कार्यक्रम सन २००५ ते २०१० या कालावधीमध्ये राबविण्यात आलेला आहे.

तसेच दिनांक १०.१२.२०१८ रोजी राष्ट्रीय पशु अनुवांशीक संसाधन ब्युरो, कर्नाल, हरियाना (NBAGR) यांना माडग्याळ मेंढयाची नोंदणी (Breed Registration) करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर संस्थेने त्यांच्या दिनांक २४.०३.२०२२ च्या पत्रान्वये माडग्याळ मेंढ्यां या कर्नाटक राज्याच्या काही भागात विखुरलेल्या असल्याने उक्त नोंदणीचा अर्ज आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य व आयुक्त पशुसंवर्धन, कर्नाटक राज्य यांच्यामार्फत एकत्रितरीत्या सादर करण्यात यावा, असे सूचित केले असून तद्रुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दारव्हा (जि.यवतमाळ) येथील शासकीय बनावट दस्तऐवजांच्या गैरव्यवहाराबाबत

(२३) ४०१८६ (०७-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) येथे शासकीय बनावट दस्तऐवज बनविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय बनावट दस्तऐवजामध्ये जात प्रमाणपत्र, कोतवाल बुकाची नक्कल प्रत, आधार कार्ड, राशन कार्ड इत्यादी बनावट दस्तऐवजाचा समावेश होत असून सदर बनावट दस्तऐवज प्रमाणित आहे असे सांगून त्याचा गैरवापर केला जात असल्याचे रॅकेट सामन्य जनतेची फसवणूक करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बनावट दस्तऐवजामध्ये शासकीय अधिकाऱ्यांच्या सही व शिक्का यांचा सर्रास गैरवापर केला जात असल्याचे महसूल अधिकाऱ्यांना लक्षात आल्यानंतरही त्यावर काही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपविभागीय अधिकारी रजेवर असताना सुध्दा त्यांच्या स्वाक्षरीचा गैरवापर शासकीय बनावट दस्तऐवजामध्ये सर्रास केला जात असून नागरिकांची फसवणूक व अनेक महिन्यापासून बनावट दस्तऐवजाचा गैरव्यवहार केला जात असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१७-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा हमी कायद्याअंतर्गत उपविभागीय कार्यालय,दारव्हा व तहसिल कार्यालय, दारव्हा (जि. यवतमाळ) मार्फत जात प्रमाणपत्र,कोतवाल बुकाची नक्कल व राशन कार्ड हे ऑनलाईन पध्दतीने सक्षम अधिका-यांच्या अंगठ्याचा ठसा देऊन डिजीटल स्वाक्षरीने प्रमाणित करुन वितरित केली जात आहे. अंगठ्याच्या ठश्याशिवाय दाखले प्रमाणित होत नाहीत. सदर दाखल्यांवरती स्वाक्षरी करण्याची आवश्यकता नसते. ऑनलाईन पद्धतीने डिजीटल स्वाक्षरीने दिलेले दाखले शिक्के मारण्याच्या वेळी त्यावरील बारकोड ऑनलाईन प्रणालीवर तपासून योग्य खात्री केली जात असते. सबब, शासकीय अधिका-यांची बनावट स्वाक्षरी व शिक्क्याचा सर्रास गैरवापर केला जात असल्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

तसेच सदर कार्यालयामार्फत आधार कार्ड वितरित करण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नेटीखेडा (ता.कळंब, जि. यवतमाळ) येथील पशु दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकारी व इतर पदे रिक्त असल्याबाबत

(२४) ४०५६९ (११-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेटीखेडा (ता.कळंब, जि.यवतमाळ) परिसरात १५ ते २० खेडेगावत एकच पशुवैद्यकीय दवाखाना असून त्या पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी हे पद एका वर्षापासून रिक्त असल्याने परिसरातील पशुपालाकास जनावरांना तपासणी करिता अडचणी येत असल्याचे दिनांक १२ ऑक्टोंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिवाळा व उन्हाळयामध्ये जनावरांवर तोंडखुरी व पायखुरी अशा आजारांची साथ येते जिल्हयात गतवर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये लसीचा पुरवठा करण्यात आला होता यावर्षी पशु दवाखान्यामध्ये डॉक्टरच नसल्याने पशुपालकांना कोणतीच माहिती मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पदाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१) व (२) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ नेटीखेडा, ता. कळंब, जि. यवतमाळ येथील पशुधन विकास अधिकारी हे पद दि. २८/०२/२०२१ पासून रिक्त आहे. तथापि पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे विविध पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. यानुसार सन २०२०-२१ मध्ये १०४५५ इतके लसीकरण करण्यात आले असून सन २०२१-२२ मध्ये ४१२९ इतके लसीकरण करण्यात आलेले आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यास त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हातनी-रायपूर-सैलानी-दुधा (जि. बुलढाणा) या राष्ट्रीय महामार्गचे भूसंपादन न झाल्याने काम प्रलंबित असल्याबाबत

(२५) ४०७०५ (१९-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातनी -रायपूर - सैलानी - दुधा (जि. बुलढाणा) या राष्ट्रीय महामार्गाचे काम गत चार वर्षापासून सुरू असून रस्ता ठिकठिकाणी खोदून ठेवल्याबद्दल नागरिकांना व प्रवाशांना त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर रस्त्याचे काम भूसंपादन न झाल्याने प्रलंबित आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने वारंवार महसूल प्रशासनाला विनंती करुनही भूसंपादन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूसंपादन न होण्याची कारणे कोणती तसेच किती दिवसांच्या कालमर्यादेत भूसंपादन करण्यात येणार आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार विहीत मुदतीचे आत कलम ३ (G) नुसार अंतिम निवाडयाची कार्यवाही पुर्ण करून मुख्य अभियंता मुंबई यांची अंतिम मंजूरी प्राप्त करून घेणे करीता भूसंपादन संस्थेस उप विभागीय अधिकारी बुलडाणा यांचे स्तरावरून पाठविण्यात आलेले आहे.

(४) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील कलम ३ (A) ते ३ (G) ची कार्यवाही विहीत मुदतीत भूसंपादन अधिकारी कार्यालयाने पुर्ण केलेली आहे. त्यानुसार या प्रकरणात कोणताही विलंब झालेला नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्य मानवाधिकार आयोगातील रिक्त पदे भरण्याबाबत

(२६) ४०७४५ (०७-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मानवाधिकार आयोगातील अध्यक्ष आणि अन्य दोन सदस्यांसह २५ पदे दोन वर्षापासून रिक्त असल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आयोगाचे कामकाज ठप्प झाले असून यासंदर्भात माहिती घेऊन सदरील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०६-०६-२०२२) : (१) व (२) शासनाने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगातील अध्यक्ष व दोन सदस्यांची पदे भरलेली आहेत. इतर रिक्त पदे भरण्याचे अधिकार आयोगास असून त्याअनुषंगाने उचित कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत..

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिराळा (जि. सांगली) तालुक्यामध्ये पशुवैद्यकिय कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याबाबत

(२७) ४०७६२ (०१-०४-२०२२). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि. सांगली) तालुक्यामध्ये मोठया प्रमाणात पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन लाखापेक्षा जास्त पशुधन असून यांचा भार फक्त २७ कर्मचाऱ्यावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुक्याच्या ठिकाणी लघुपशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय व आवश्यक असणारी उपकरणे उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांना उपचाराकरिता पशुधन घेऊन इस्लांमपूर किंवा कोल्हापूर जिल्हयातील कोडोली येथे जावे लागत असल्यामुळे मोठया प्रमाणात उपचाराअभावी शेतकऱ्यांचे पशुधन मृत पावत असल्याचे निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पशुवैदयकीय कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत तसेच वाकुर्डे बु. येथे पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर असून त्याकरिता नवीन इमारतीस प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१) व (२)

शिराळा (जि. सांगली) तालुक्यात २० व्या पशुगणनेनुसार गायवर्ग २६४९६, म्हैसवर्ग ४५८९८, शेळया ६९९५, मेंढ्या १७४६ आणि कुक्कुट १५७८०६ याप्रमाणे पशुधन उपलब्ध आहे, शिराळा तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांतील पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

पद	मंजूर	भरलेली	रिक्त
पशुधन विकास अधिकारी	१५	०६	०९
सहायक पशुधन विकास अधिकारी	०४	०४	००
पशुधन पर्यवेक्षक	०७	०४	०३
व्रणोपचारक	१०	०९	०१
परिचर	२७	२४	०३
एकूण	**६३**	**४७**	**१६**

रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात येवून पशुपालकांना नियमितपणे आवश्यक पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे पुरविण्यात येत आहेत.
(३) सांगली जिल्ह्यात मिरज येथे जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय कार्यरत असून सांगली, इस्लामपूर, तासगाव, विटा व कवठेमहांकाळ येथे प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ५ तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय कार्यरत आहेत. शिराळा तालुक्यात सद्यस्थितीत तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय स्थापन करण्यात आलेले नसून, तालुक्याच्या ठिकाणी शेण तपासणी, लघवी तपासणी व रक्त तपासणी उपकरणे व सुविधा उपलब्ध आहेत.
(४) शिराळा तालुक्यात सद्यस्थितीत तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय स्थापन करण्यात आलेले नसल्यामुळे क्ष-किरण यंत्रणा उपलब्ध नाही सबब पशुधनाच्या पोटात अखाद्य वस्तू जाणे अथवा इतर तत्सम आजारांच्या निदानाकरिता पशुवैद्यकांच्या सल्ल्याने नजीकच्या इस्लामपूर अथवा कोडोली, जि. कोल्हापूर येथील तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय येथे जावे लागते, तथापि उपचारांअभावी शेतकऱ्यांचे पशुधन मृत पावल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २९८ रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात क्र. १२/२०२२ प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यास त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. वित्त विभाग शासन निर्णय दि. ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु असून, सदरहू सुधारीत आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर विहित प्रक्रियेद्वारे गट-क संवर्गातील पदे भरण्याचे संकल्पित आहे.

वाकुर्डे बु. येथे पशुसंवर्धन विभागाची १ गुंठा जागा उपलब्ध असून, या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ कार्यरत आहे. आराखड्यानुसार नवीन इमारत बांधण्यास सदर जागा पुरेशी नसल्यामुळे वाकुर्डे बु. ग्रामपंचायतीकडे किमान १० गुंठे क्षेत्राची मागणी करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

हवेली भूमिअभिलेख विभागात अपुऱ्या मनुष्यबळामुळे होणाऱ्या दिरंगाईबाबत

(२८) ४०७८० (०१-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली भूमिअभिलेख विभागात दर महिन्याला अंदाजित ५०० ते ६०० प्रकरणे दाखल होत असताना अपुऱ्या मनुष्यबळामुळे निम्मी प्रकरणे सहा-सहा महिने प्रलंबित असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पैसे जमा करुन खरेदी केलेल्या जमीन, प्लॉट, शेती, घर याचे क्षेत्रफळ मोजणीचे काम प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२१-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
उपअधीक्षक भूमि अभिलेख, हवेली कार्यालयात भूकरमापकाचे २६ मंजूर पदे असून ते कार्यरत आहेत. तसेच इतर १० कर्मचा-यांच्या सेवा मोजणी प्रकरणे निकाली कामी वापरण्यात येत आहेत.
उपअधीक्षक भूमि अभिलेख, हवेली कार्यालयात सरासरी दर महिना ६५० प्रकरणांची आवक आहे. सद्यास्थितीत मार्च २०२२ अखेर १०७२२ प्रकरणे प्राप्त झाले असून त्यापैकी ७८५४ प्रकरणे निकाली झालेली आहेत. डिसेंबर २०२१ मधील एकूण शिल्लक ३५४० वरुन मार्च २०२२ अखेर २८६८ वर आलेली आहे.
(२) (३) हे खरे नाही.
तथापि, उपअधीक्षक भूमि अभिलेख, हवेली कार्यालयातील मोजणी प्रकरणे निपटारा करणेकामी खालील प्रमाणे उपाययोजना केली आहे.
१. प्रलंबित मोजणी प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी मोजणी प्रकरणे गावनिहाय एकत्रीत करुन एकाच भूकरमापकास देऊन मोजणी काम करण्यात येत आहे. त्यामुळे मोजणी प्रकरणे जलदगतीने निपटारा होत आहेत.
२. जिल्हाधिकारी, पुणे यांनी पुणे जिल्हयात मोजणी कामी ३५ रोव्हर मशीन युनीट मार्च २०२२ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्याने मोजणी प्रकरणे निर्गतीचे प्रमाण वाढविण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
३. उपअधीक्षक भूमि अभिलेख, हवेली कार्यालयातील प्रकरणांचा निपटारा करणेकामी एकूण ४५ कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात आले होते. सदर कर्मचा-यांनी ९० प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे.
४. विभागाचे १ माहातील भूकरमापकाचे सरासरी मोजणीचे प्रमाण १५ असून उपअधीक्षक भूमि अभिलेख, हवेली कार्यालयाने गेल्या जुन २०२१ पासून डिसेंबर २०२१ पर्यंत २२ च्या सरासरीने व जानेवारी २०२२ पासून ३३ च्या सरासरीने मोजणी करुन दरमहा सरासरी ९०० प्रकरणे निर्गत केली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धामणगाव (जि.अमरावती) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे पद रिक्त असल्याबाबत

(२९) ४०९९५ (०१-०४-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यात राज्य शासनाचा पशु वैद्यकीय दवाखाना हा मागील चार महिन्यापासून बंद असल्यामुळे तेथील पशुपालकांना गुरांच्या उपचारासाठी इतर ठिकाणी जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील पशुवैद्यकीय दवाखान्यामधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची दुसऱ्या ठिकाणी नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुपालकांची गैरसोय होत असल्यामुळे यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

धामणगाव रेल्वे (जि. अमरावती) येथील राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ येथील कार्यरत पशुधन विकास अधिकारी यांची पदोन्नतीमुळे बदली झाल्याने सदर पद दि. १८/०५/२०२१ पासून रिक्त झाले आहे, तथापि सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात क्र. १२/२०२२ प्रसिद्ध करण्यात आलेली असून कार्यवाही सुरु असून, सदर अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर अथवा नियतकालीक बदलीच्या माध्यमातून उक्त रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील शासकीय जमिनीमधून जागा नसलेल्या लाभार्थ्यांना भूखंडाचे मोफत सीमांकन करून देण्याबाबत

(३०) ४०९९९ (१२-०४-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील ४० गावांमधील सर्वांसाठी घरे सन २०२० या कालावधी अंतर्गत लाभार्थ्यांना ई वर्ग एफ वर्ग शासकीय जमिनीमधून निवासस्थान प्रयोजनासाठी जागा नसलेल्या लाभार्थ्यांना मिळण्याबाबत महसूल विभागाकडून मंजुरी प्राप्त झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूखंडाचे सीमांकन करून देण्याबाबत भुमिअभिलेख नांदगाव खंडेश्वर यांनी कोणती प्रक्रिया राबविली असल्यास संबंधित घरकुल धारकांची आर्थिक स्थिती गंभीर असल्याने त्यांना भूखंडाचे मोफत सीमांकन करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०६-२०२२) : (१) नांदगाव खंडेश्वर तालुक्यामध्ये सर्वासाठी घरे सन २०२२ अंतर्गत ई -क्लास व एफ क्लास शासकीय जमीनीमधुन घरकुलाच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जागा मिळण्याबाबत ४० गावाचे प्रस्ताव प्राप्त झालेले होते. त्यापैकी सहायक संचालक, नगर रचना यांची मान्यता असलेल्या अभिन्यास असलेल्या १९ गावांचे प्रस्तावांना उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांची मान्यता प्राप्त झालेली असुन तसे आदेश निर्गमित झालेले आहेत.

(२) जिल्हाधिकारी अमरावती कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष / अका महसुल / कावि-२८६ / २०१८, दि.१२/०७/०१८ नुसार जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, कार्यालय, अमरावती यांना आदेश देऊन शासनाची सर्वांसाठी घरे २०२२ ही योजना सार्वजनिक सुविधा व सार्वजनिक प्रयोजनासाठी असल्याने अशा मोजणी प्रकरणामध्ये मोजणी शुल्क आकारण्यात येऊ नये असे निर्देशीत केलेले होते. त्यानुसार नांदगाव खं. तालुक्यातील ४० गावांचे सर्वासाठी घरे २०२२ अंतर्गत जागा मागणीच्या प्रकरणामध्ये भुमी अभिलेख विभागामार्फत मोफत मोजणी करण्यात आलेली आहे.
परंतु मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भुमी अभिलेख, पुणे यांचेकडील आदेश क्र. भुमापन -२ / प्र.क्र ०४/०१६, दि.०३/८/२०१६ नुसार सर्वासाठी घरे २०२२ अंतर्गत मोजणीस प्रचलित मोजणी फी च्या ५०% सवलत अनुज्ञेय आहे.
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भुमापन),पुणे यांचे दि.१४/१०/२०२१ आदेशानुसार गटविकास अधिकारी, नांदगाव खंडेश्वर यांचेकडुन ५० टक्के मोजणी फी भरणा करणेबाबत प्रक्रिया सुरु आहे.
(३) गटविकास अधिकारी, नांदगाव खंडेश्वर यांचेकडुन ५० टक्के मोजणी फी भरणा करणेबाबत प्रक्रिया सुरु आहे. भुमी अभिलेख विभागाकडुन सीमांकन करुन घेण्यात येत आहे.

बीड जिल्हयात आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबाबत

(३१) ४१३८६ (१२-०४-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात दिनांक २२ नोव्हेंबर,२०२१ ते २७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालावधीत एकात्मिक बाल विकास सेवा योजना बीड-१ व बीड-२ च्या बालविकास प्रकल्प अधिकारी-२ यांनी दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास श्रीमती इंगोले बायना रामराव यांची अंगणवाडी सेविका म्हणून समनापूर, ता. बीड अंतर्गत नेमणूकीचे आदेश देऊन निवडणूक आचार संहितेचे उल्लंघन करुन स्वत:च्या अधिकारात नेमणुकीचे आदेश दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याप्रकरणात प्रकल्प विस्तार अधिकारी श्री. भटे व प्रभारी प्रकल्प अधिकारी श्रीमती बढे तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. केकाण यांचा समावेश असून यामध्ये संगनमताने आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी थेट नेमणूकीमुळे समनापूर येथील अन्य महिलांवर अन्याय झाल्याचे नमूद करुन दि. २८ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. महिला व बालविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे सदर तिन्ही अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करुन कारवाईची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार या प्रकरणामध्ये दोषी आढळलेल्या सर्व संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (१४-७-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
राज्य निवडणूक आयोगाने बीड जिल्ह्यातील निवडणूका असलेल्या ग्रामपंचायतींसाठी आचारसंहिता लागू केली होती.
(२) हे खरे नाही.
समनापूर, ता.बीड या गावात ग्रामपंचायत निवडणूक नसल्याने तेथे आचारसंहिता लागू नव्हती.
(३), (४), (५) व (६) लोकप्रतिनिधींच्या दि.२८.०१.२०२२ च्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे.

मेहकर (जि.बुलढाणा) तहसिल कार्यालयांतर्गत ९८ ग्रामपंचायती असून या कार्यालयात नायब तहसिलदारांची पदे रिक्त असल्याबाबत

(३२) ४१४२७ (०६-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तहसिल कार्यालयांतर्गत ९८ ग्रामपंचायती असून नायब तहसिलदारांची पदे रिक्त असल्याबाबत या सर्व गावांतील नागरिकांचा महसूल खात्याशी थेट संबध येत असतानाही या कार्यालयातील पाचही नायब तहसिलदारांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या तहसिलचा कारभार प्रभारीकडे दिल्यामुळे अनेक विकासाची कामे रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे असण्याची कारणे काय आहेत तसेच ही रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.

तथापि या वर्षीच्या नियतकालिक बदल्यांमध्ये दोन अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रस्तावित असून अमरावती विभागातील अव्वल कारकून/मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार पदावरील पदोन्नतीच्या प्रस्तावामध्ये नजिकच्या काळात मेहकर, जि.बुलढाणा या तहसिल कार्यालयातील सर्व पदे भरण्याचे प्रस्तावित आहे.

राधानगरी (जि.कोल्हापूर) येथे स्टोन क्रशरवरील कारवाई टाळण्यासाठी प्रांताधिकारी व सरपंच यांनी लाच घेतल्याबाबत

(३३) ४१७२१ (१२-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) प्रांताधिकारी आणि फराळे येथील सरपंच स्टोन क्रशरवरील कारवाई टाळण्यासाठी साडेपाच लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्याने कसबा वाळवे येथील मंडळ अधिकारी यांना लाच घेताना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी लाच घेताना महसूल विभागात काही महिन्यात वाढ झाल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-०६-२०२२) : (१) राधानगरी (जि.कोल्हापूर) प्रांताधिकारी आणि फराळे येथील सरपंच यांना स्टोन क्रशरवरील कारवाई टाळण्यासाठी साडेपाच लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ०९/०१/२०२२ रोजी रंगेहाथ पकडले. त्यांच्यावर शाहुपूरी पोलीस ठाणे, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर येथे गु.र.नं.२३/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८, कलम-७, ७अ, १२ प्रमाणे दि.१०/०१/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अन्य एका प्रकरणी खरेदी केलेल्या जमिनीचे ७/१२ पत्रकीवर नाव नोंदविणेकरीता लाच घेताना मंडळ अधिकारी, कसबा वाळवा यांना दि.१५/०६/२०२१ रोजी अटक केली आहे.

(२) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सन २०२१ मध्ये करण्यात आलेल्या एकूण ७६४ सापळा प्रकरणांमध्ये महसूल विभागाची १७८ प्रकरणे आहेत. व सन २०२२ मध्ये जानेवारी-२०२२ अखेर एकुण ४६ सापळा प्रकरणांमध्ये महसूल विभागाची १३ प्रकरणे आहेत.

(३) उपरोक्त प्रकरणी तत्कालीन उपविभागीय अधिकारी, राधानगरी-कागल उपविभागीय कार्यालय व अन्य प्रकरणी

तत्कालीन मंडळ अधिकारी, कसबा वाळवा, ता.राधानगरी यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे गेल्या वर्षभरात अप्पर तहसिल कार्यालयाने अवैध उत्खनन आणि गौण खनिजाच्या वाहतूकीवर केलेल्या कारवाईबाबत

(३४) ४१७३० (०७-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे गेल्या वर्षभरात अप्पर तहसिल कार्यालयाने, अवैध उत्खनन आणि गौण खनिजाच्या वाहतूकीवर बंदी केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात किती जणांवर कारवाई करण्यात आली व किती दंडाची वसूली करण्यात आली आहे ,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०६-०७-२०२२) : (१), (२), (३) व (४) हातकणंगले तालुक्यातील अपर तहसिलदार इचलकरंजी, जि.कोल्हापूर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात माती, मुरूम, दगड, वाळू, क्रश सॅन्ड, व सिलिका सॅन्ड यांची अवैध वाहतुक करणाऱ्या एकुण १९ वाहनांवर कारवाई करून रू.२३,४७,४०४ इतका दंड शासन जमा करण्यात आलेला आहे. तसेच, मौजे साजणी येथे दिलेल्या गौण खनिज परवान्यापेक्षा अतिरिक्त उत्खनन केल्याप्रकरणी संबंधिताकडून रू.२६,४५,५१३/- इतका दंड वसुल करून शासन जमा करण्यात आलेला आहे.

दौंड (जि. पुणे) येथील पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती अंतर्गत रिक्त पदे भरण्याबाबत

(३५) ४२००२ (०६-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) येथील पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती, अंतर्गत पशुधन विकास अधिकारी (३ पदे) पशुधन पर्यवेक्षक, (२ पदे), परिचर, (६ पदे) अशी एकूण ११ पदे रिक्त आहेत हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त पदे भरण्याबाबत मा.लोकप्रतीनिधिनी दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१) व (२) जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत दौंड तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील संवर्गनिहाय पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

पद	मंजूर	भरलेली	रिक्त
पशुधन विकास अधिकारी	१४	१३	१
सहायक पशुधन विकास अधिकारी	०२	०२	००
पशुधन पर्यवेक्षक	१५	१३	०२
व्रणोपचारक	०६	०६	००
परिचर	२७	२१	०६
एकूण	**६४**	**५५**	**०९**

पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यास त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. वित्त विभाग शासन निर्णय दि. ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु असून, सदरहू सुधारीत आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर विहित प्रक्रियेद्वारे गट-क संवर्गातील पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मलकापूर (जि.बुलढाणा) शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन प्रशासकीय इमारत तसेच अधिकारी शासकीय निवासस्थाने व कर्मचारी रहिवासी इमारत बांधण्याबाबत

(३६) ४२०८७ (०७-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) मतदार संघातील शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन प्रशासकीय इमारत तसेच अधिकारी शासकीय निवासस्थाने व कर्मचारी रहिवासी इमारत बांधण्याबाबतची मागणी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त राज्याच्या पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत अन्य ठिकाणी बांधकामे करुन मिळण्याबाबत शासनास रितसर प्रस्ताव दिनांक १७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी पाठविला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात दोन वर्षांपासून प्रलंबित प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०६-२०२२) : (१) व (२) होय.
(३)
I. शासन पत्र, गृह विभाग, क्र.बांधका-०१२२/प्र.क्र.०१/पोल-७, दिनांक १२.०१.२०२२ अन्वये एकूण ८७ पोलीस ठाणेच्या प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्राधान्यक्रम यादीस शासनाने मान्यता प्रदान केली आहे. सदर यादीमध्ये बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाणे बांधकाम प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कामे महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, यांच्या मार्फत हाती घेण्यात येणार आहे.
II. तसेच राज्यातील १८४ पोलीस ठाणे व ५३ इतर कार्यालयीन प्रशासकीय इमारत बांधकामाची प्राधान्यक्रम यादीस मान्यता देण्याची कार्यवाही चालू आहे.
III. प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामे महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, यांच्या मार्फत हाती घेण्यात येणार आहे.
IV. राज्यातील एकूण ५६९२३ पोलीस सेवानिवासस्थानांच्या बांधकामासाठी प्राधान्यक्रम यादीस शासन मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर यादीमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील जालंब, पिंपळगांव राजा, हिवरखेड, मलकापूर शहर व ग्रामीण पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता २९९ सेवानिवासस्थानांचे बांधकाम प्रकल्पाचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोसारा (जि.यवतमाळ) येथील रेती घाटावरून ओव्हरलोड रेती वाहतुक केल्याबाबत

(३७) ४२१०५ (२२-०३-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोसारा (जि.यवतमाळ) येथील हर्रास झालेल्या रेती घाटावरून वाहतुक नियमाची पायमल्ली करून यवतमाळ व चंद्रपूर जिल्हयात ओव्हरलोड रेती वाहतुक होत असल्याचे दिनाक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खैरी ता.राळेगाव येथील नागरीकांनी परिसरातुन रात्र दिवस होणा-या ओव्हरलोड वाहतुकीमुळे त्रस्त होउन उपविभागीय अधिकारी राळेगाव यांना निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुशंगाने रेती ऱ्हास झालेल्या घाटावरून होणा-या ओव्हरलोड वाहतुकीवर आळा घालण्यासाठी कोणत्या उपाय योजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (०६-०७-२०२२) : (१), (२), (३) व (४) मौजे खैरी, ता.राळेगांव येथील नागरीकांनी परिसरातून रात्र दिवस होणाऱ्या ओव्हरलोड वाहतुकीची बाब उपविभागीय अधिकारी, राळेगाव यांना निवेदनद्वारे निदर्शनास आणून दिली आहे.

कोसारा रेती घाटावरून रेतीची अवैध व ओव्हरलोड वाहतूक होऊ नये याकरीता खैरी,ता.राळेगाव येथे तपासणी नाका उभारण्यात आला आहे. तपासणी नाका स्थापन झाल्यापासून एकुण ६ वाहनांवर अवैधरित्या वाहतूक केल्याप्रकरणी दंडात्मक कार्यवाही करून रू.९,६८,२६०/- इतका दंड शासन जमा करण्यात आलेला आहे..

भिवंडी शहरात तरुणवर्ग अंमली पदार्थांच्या सेवनाच्या आहारी गेल्याबाबत

(३८) ४२१२२ (१२-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी मतदारसंघात गोरगरीब नागरिक राहत असून भिवंडी शहर हे पावरलूम शहर असल्यामुळे स्थलांतरित व अस्थलांतरित कामगारवर्ग येथे मोठ्या प्रमाणावर राहत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तेथील राहणीमानाचा दर्जा खालावलेला असल्यामुळे तरुणवर्ग मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थाच्या आहारी गेलेला असून येथील तरुणवर्ग हा हेरॉईन, कोकेन या अंमली पदार्थासोबतच नकली औषधे, कफ, आयोडेक्स झोरम (बोली भाषेनुसार) तसेच पेपर, बटन, चरस, गांजा, एमडी इत्यादी अंमली पदार्थाच्या सेवनाच्या आहारी गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २० डिसेंबर २०२१ रोजी वा त्यासुमारास अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्या संयुक्त कार्य दलाची निर्मिती करुन भिवंडी शहरातील अंमली पदार्थांच्या सेवनावर आळा घालण्याचे निवेदन दिले हे ही ,खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-२ भिवंडी येथे सन २०२२ मध्ये पोलीस विभागाने केलेल्या कार्यवाहीत गांजा सेवनाबाबत २१ गुन्हे दाखल करण्यात आले असून गांजा व एम.डी पावडर विक्रीचे ३ असे एकूण २४ गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर २४ गुन्हे उघड झाले आहेत व त्यामध्ये एकूण ३० आरोपितांना अटक करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सन २०२२ मध्ये अन्न व औषध प्रशासन व पोलीस विभाग यांच्या दलाने संयुक्तपणे कार्यवाही करून १ गुन्हा दाखल करण्यात आला व त्यामध्ये १ आरोपितास अटक करण्यात आली असून अंमली पदार्थ जप्त केले आहेत. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयातून शेतकऱ्यांना वेळेवर मोजणी उपलब्ध होत नसल्याबाबत

(३९) ४२१२८ (०५-०४-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यात उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयामध्ये साधी, तातडी, अतितातडी, अतिअतितातडी अशा मोजणीचे प्रकार असून या प्रकारामध्ये शेतकऱ्यांकडून मोजणीसाठी चलनाद्वारे भरणा करुन घेतला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक शेतकऱ्यांना उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडून मोजणी वेळेवर उपलब्ध होत नसणे, मोजणी झाल्यानंतर हद्द कायम करण्यात उशिर होणे अशा तक्रारी शेतकऱ्यांकडून निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोजणीच्या प्रकारानुसार मोजणी धारकांनी भरणा केलेल्या नंबरप्रमाणे मोजण्या झालेल्या आहेत काय याची चौकशी होण्याबाबत व मोजणीधारकांना वेळेवर मोजणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१६-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे, उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या सेवा वापरून मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत. अतिरिक्त प्रतिनियुक्तीवर २ भूकरमापक देण्यात आले आहेत. शिरूर तालुक्यासाठी अत्याधुनिक कॉर्स स्टेशन उभारण्यात आले असून शिरूर तालुक्यासाठी ३ रोव्हर्स कायमस्वरूपी व ४ अतिरिक्त रोव्हर्स मोजणी यंत्र तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. उपलब्ध कर्मचारी यांच्या सेवा प्रभावीपणे वापरून व अत्याधुनिक यंत्रांचा वापर करून मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.तसेच रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सूरू आहे. रिक्त पदांच्या भरतीनंतर मोजणी प्रकरणे अधिक गतीने निकाली होणार आहेत.

धुळे जिल्हयात भूमिलेख कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण ७५ टक्के पदे रिक्त असल्याबाबत

(४०) ४२२९८ (०७-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयात भूमिलेख कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण ७५ टक्के पदे रिक्त असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांनी खरेदी केलेली जमीन, प्लॉटचे मोजणीचे काम सहा - सहा महिने प्रलंबित राहत असून नागरिकांना प्रतीक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२१-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

धुळे जिल्ह्यातील मोजणी प्रकरणांची आवक पहाता पुरेसे कर्मचारी उपलब्ध आहेत. परंतु जिल्ह्यात अभिलेखांचे डिजिटायझेशन, E-PCIS, ड्रोनद्वारे गावठाण सर्व्हे, भूसंपादन दुरूस्ती प्रकरणे इत्यादी प्रकरणांची मोठ्या प्रमाणावर आवक तसेच मागील दोन वर्षात कोवीड विषाणू संसर्गामूळे प्रलंबित पडलेली मोजणी प्रकरणे यामुळे कामकाजात काही अंशी विलंब होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे दहिवली (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.३२/१ व ३३/अ/१ ही जमीन सडक व राजमार्ग मंत्रालय भारत सरकार यांनी वडोदरा एक्सप्रेस करिता संपादित केल्याबाबत

(४१) ४२३६४ (१२-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दहिवली (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.३२/१ व ३३/अ/१ ही जमीन सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय भारत सरकार यांनी वडोदरा एक्सप्रेस करीता संपादित केली परंतु त्याचा मोबदला मूळ शेतकऱ्यांना न देता परस्पर प्रकाश बारकू गवळी व त्यांचे कुटुंबियांचे तसेच नातेवाईकांच्या नावे हस्तांतरण केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्या अनुषंगाने मूळ शेतकऱ्यांना डावलून इतर शेतकऱ्यांना मोबदला देणाऱ्या तत्कालीन उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी यांच्यावर तसेच मूळ शेतकऱ्याचे पैसे हडप करणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. बाळासाहेब थोरात (१६-०६-२०२२) : (१) हे, खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

मादक द्रव्य सेवन प्रकरणामध्ये अधिकाऱ्यांनाच लाच देण्याचा प्रयत्न केल्याबाबत

(४२) ४२३८० (१३-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मादक द्रव्य सेवन प्रकरणामध्ये अभिनेत्याच्या मुलाने अधिकाऱ्यांनाच लाच देण्याचा प्रयत्न केल्याने त्याची चौकशी करण्यासाठी मुंबई पोलिसांची विशेष समिती गठित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबतचा समितीचा अहवाल सादर झाला आहे काय, तसेच अहवाल कधीपर्यंत प्राप्त होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-०६-२०२२) : (१) व (२) एन.सी.बी. मुंबई यांनी कॉर्डेलिया क्रुझवर घातलेल्या धाडीच्या अनुषंगाने प्राप्त चार तक्रार अर्जाची चौकशी करण्याकरीता मुंबई पोलीस आयुक्तालयातर्गत ४ पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर याप्रकरणी एन.सी.बी. चे डेप्युटी डायरेक्टर श्री.ज्ञानेश्वर सिंह यांची नियुक्ती करण्यात आल्याने एन.सी.बी. च्या विशेष चौकशी समितीला चारही तक्रार अर्जाच्या प्रती पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आलेले आहेत. तसेच डेप्युटी डायरेक्टर जनरल ऑफ एन.सी.बी. यांच्या अधिपत्याखालील विशेष तपास पथक

गठीत करण्यात आले असून त्यांच्याकडून मुंबई एन.सी.बी. येथील दाखल केलेल्या कॉर्डेलिया क्रुझ रेड संबंधीत गुन्ह्याचा तपास करण्यात येत आहे. यास्तव, मुंबई पोलीसांतर्फे चौकशी स्थगित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जिल्हयातील सर्व तालुक्यांसाठी प्रधानमंत्री पिक विमा योजना २०२१-२०२२ अंतर्गत प्रतिकुल हवामान परिस्थिती अधिसूचना लागू केली असल्याबाबत.

(४३) ४२४०५ (०७-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हयातील सर्व तालुक्यांसाठी प्रधानमंत्री पिक विमा योजना सन २०२१-२०२२ या कालावधीत अंतर्गत प्रतिकुल हवामान परिस्थिती अधिसूचना लागू केली असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अधिसूचनेचा किती शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत, खरीप २०२१ मध्ये हंगामातील प्रतिकुल परिस्थितीमुळे होणारे नुकसान या बाबी अंतर्गत २३ जिल्हयांमार्फत अधिसूचना निर्गमित करण्यात आली होती.
(२) प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण १२.७२ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ४५१.५७ कोटी निश्चित करण्यात आली आहे.
(३) प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत हंगामातील प्रतिकुल परिस्थितीत झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण १२.७२ लाख शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ४५१.५७ कोटी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ११.६९ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. ४४३.४३ कोटी वाटप करण्यात आले आहेत. उर्वरित १.०३ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. ८.१४ कोटी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाडयातील लालकंधारी गायींचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(४४) ४२४०९ (०७-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयातील लालकंधारी गायींच्या प्रकल्पांसाठी मा. मुख्यमंत्री यांनी पाच कोटींचा निधी देण्याचे घोषीत करुनही हा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानानंतर मराठवाडयासह महाराष्ट्रात लालकंधारी जातीच्या जनावरांचे महत्व वाढले असल्यामुळे या प्रकल्पांतर्गत उपलब्ध गोठयाचे आधुनिकीकरण, प्रजनन सुलभता, प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे, दूध उत्पादनाचा विकास व प्रसार, पुरेसे मनुष्यबळ इ.चा प्रस्तावात समावेश करण्याबाबतच्या प्रस्तावाला शासनाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२४-०६-२०२२) : (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर पशुसंवर्धन विभागातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत

(४५) ४२९७३ (१२-०४-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील व शहरातील उत्तर सोलापूर तालुक्यात गाय, म्हैस, शेळी, मेंढी या वर्गातील ५६ हजार पशुसंवर्धन आरोग्याची देखभाल करण्यासाठी सुमारे ३० अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असताना अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक २९ डिसेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट-अ अधिकाऱ्याची नेमणूक शासनामार्फत केली जाते त्या नेमणुका करण्यात आल्या वा कसे, तसेच उत्तर तालुक्यातील रिक्त पदांची परिस्थिती पाहता अक्कलकोट तालुक्यात अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पदे भरून पशुपालकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनिल केदार (२७-०६-२०२२) : (१) २० व्या पशुगणनेनुसार सोलापुर जिल्ह्यामध्ये गायवर्ग-७,४५,४०४; म्हैसवर्ग-४,९६,४५४; शेळया- ९,६२,५०४ व मेंढ्या-१,२५,३८६ याप्रमाणे पशुधन असून, उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये गायवर्ग-१३,५८१; म्हैसवर्ग-१८,१८९; शेळया-२२,५१० व मेंढ्या-१,८९६ याप्रमाणे पशुधन उपलब्ध आहे. उत्तर सोलापूर तालुक्यामधील पशुवैद्यकीय संस्था/दवाखान्यांमध्ये एकूण १४ पदे मंजूर आहेत, यापैकी ११ पदे भरलेली असून, ३ पदे रिक्त आहेत.

(२) पशुसंवर्धन विभागातील सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील पदांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवा भरती शासनाद्वारे केली जाते. शासन आदेश दि. ०८/०२/२०२२ अन्वये एकूण ४२८ पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी २३ अधिकाऱ्यांची सोलापूर जिल्ह्यात पदस्थापना करण्यात आली असून, ३ अधिकारी अक्कलकोट तालुक्यात रुजु झाले आहेत.

(३) पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना/पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, भरतीची कर्यवाही सुरु आहे. वित्त विभाग शासन निर्णय दि. ०४/०५/२०२० अन्वये नवीन पद भरती न करण्याबाबत निर्देश असल्यामुळे बाह्य स्त्रोतांद्वारे २६२ पशुधन पर्यवेक्षकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु असून, सदरहू सुधारीत आकृतीबंध अंतिम झाल्यानंतर विहित प्रक्रियेद्वारे गट-क संवर्गातील पदे भरण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि. बीड.) येथे महाबीज कार्यालय व गोडाऊन बीज प्रक्रिया सुरु करण्याच्या मागणीबाबत

(४६) ४३१२१ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे महाबीज कार्यालय व गोडाऊन शहरापासून १० ते १५ कि.मी अंतरावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यानां खूप त्रास होत असून त्यांचा वेळ व पैसा वाया जात आहे त्यामुळे अंबाजोगाई शहरात सर्वे.नं. १७ मध्ये गायरान जमीन मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत सदरील शासकीय जमिनिची महाबीज

कार्यालय व गोडाऊन बीज प्रक्रिया केंद्रासाठी मागणी करावी व सदर जागा मिळाल्यानंतर प्रशासकीय मंजुरी द्यावी व त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कृषीमंत्री यांच्याकडे दिनांक २३ मार्च,२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली , वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१६-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) अंबाजोगाई जि. बीड येथील तालुका बीज गुणन केंद्राची २२०.२४ हे. प्रक्षेत्र वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास लीज तत्वावर देण्यात आलेले आहे. सदर प्रक्षेत्रातील ५ एकर जमीन बीज प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी महाबीज, अकोला यांना उपलब्ध करुन देण्याचा महाबीज, अकोला यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. जमीन हस्तांतरणाबाबत महसूल व वन विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. त्यानुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत सीताफळ संशोधन केंद्राची ५ एकर जमीन महाबीजला देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्हयातील शेतीचे आधुनिकीकरण करण्यांकरीता १०० कृषी ड्रोन केंद्र सुरु करणेबाबत

(४७) ४३१९३ (०७-०४-२०२२). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील शेतीचे आधुनिकीकरण करण्यांसाठी किमान १०० कृषी ड्रोन केंद्र कृषी विदयापीठ ,टाटा सामाजिक संस्था, कृषी विभागाचे अधिकारी, व कांही शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनिधींच्या सहकार्याने सुरु करण्यांचे उदिष्ट निश्चित करण्यात आल्याचे माहे १ फेब्रूवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महत्वाकांक्षी प्रकल्पाला चालना देण्यांसाठी शासना स्तरावरुन काही धोरण निश्चीत करण्यांत आलेले आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबीची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही,
(२) केंद्र शासनाने दि. १७ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये कृषि यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीच्या सेवा व सुविधा उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) सन २०२२-२३ साठी कृषि यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत राज्य शासनाने केंद्र शासनास वार्षिक कृति आराखडा (AAP) मंजूरीस्तव सादर केला असून त्यात ड्रोनसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली पूर्व (मुंबई उपनगर) ओबेरॉय स्काय सिटीच्या विकासकांकडून घेण्यात येणाऱ्या रॉयल्टीबाबत

(४८) ४३४६८ (०७-०४-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली पूर्व (मुंबई उपनगर) येथील ओबेरॉय स्काय सिटीच्या विकासकांकडून घेण्यात येणा-या रॉयल्टीबाबत

चौकशी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२२-०६-२०२२) : (१), (२), व (३) होय हे खरे आहे. तथापि, सदर निवेदन हे दिनांक १८ जानेवारी,२०२० रोजीचे आहे.

सदर प्रकरणी तहसिलदार, बोरीवली व उपविभागीय अधिकारी, मुंबई (पश्चिम उपनगर) यांनी मे.इन्काईन रिएलिटी प्रा.लि. (ओबेरॉय स्काय सिटी) यांचे विरूध्द अनधिकृत उत्खनन केल्याबाबत दंडात्मक आदेश पारित करण्यात आले आहे.

तथापि, मे.इन्काईन रिएलिटी प्रा.लि. यांनी गौणखनिज उत्खननापेक्षा जास्त परिमाणाच्या परवानग्या मा.अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर या कार्यालयाकडून घेतल्याचे नंतर निदर्शनास आले असून सदर आदेशांची यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम २५८ मधील तरतुदीनुसार पुनर्विलाकनाची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या स्तरावर सुरू आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध विभागामध्ये कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्याबाबत

(४९) ४३८३२ (०४-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध विभागामध्ये कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध विभागामध्ये कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्याबाबत विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, किती पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना नियुक्या देण्यात आल्या आहेत ,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०६-०६-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी शासन परिपत्रक दि. ०२/०३२०१९ व ३०/०९/२०२० नुसार कंत्राटी तत्वावर नियुक्त करावयाची पदे अंशकालीन उमेदवारांमधून भरण्याबाबत जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख तथा नियुक्ती प्राधिकारी यांची आढावा बैठक दिनांक २९/०१/२०२० व दि. १७/०३/२०२१ रोजी घेतली. शासनाच्या निर्देशा नुसार कार्यवाही करण्याची सूचना सर्व संबंधितांना दिल्या.
(३) नोंदणीकृत ५७२ उमेदवारांपैकी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ नुसार समांतर आरक्षणांतर्गत कायम स्वरूपी नोकरीस लागलेले उमेदवार - २१२, कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवार - ७९ असे एकूण २९१ उमेदवार नोकरीत लागलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बालगृहातील मुलांना कोरोनाची बाधा होवू नये यासाठी करावयाचा उपाययोजना

(५०) ४३९९६ (१२-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील चेंबूर चिल्ड्रेन होम बालगृहातील १८ मुलांना कोरोनाची बाधा झाली असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार येथील कोरोना बाधीत मुलांवर तातडीने उपचार करण्यासह राज्यातील बालगृहातील मुलांना कोरोनाची बाधा होवू नये यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (१४-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे,

चेंबूर चिल्ड्रेन्स होम, मानखुर्द या संस्थेत दि.३०/८/२०२१ रोजी वा त्या सुमारास एकूण १८ प्रवेशितांना कोरोनाची लागण झाली. तथापि, ०२ प्रवेशित सोडून इतर १६ प्रवेशितांना कोरोना सदृश्य कोणतेही लक्षण आढळून आले नाही. परिणामी एकूण १८ प्रवेशितांना पुढील वैद्यकय उपचारासाठी तात्काळ दि.२८/८/२०२१ रोजी गडकरी व्हिडीओकॉन अतिथी सेंटर, एच.पी.सी.एल.जवळ, वाशीनाका, चेंबूर, मुंबई या कोव्हिड सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. प्रवेशितांचे कोरोना अहवाल निगेटीव्ह आल्यानंतर प्रवेशितांना पुन:श्च संस्थेत दाखल करण्यात आले आहे. सबब सदर प्रकरणी चौकशीची आवश्यकता नाही.
(२) सर्व कोरोना बाधितांवर आवश्यक उपचार करुन त्यांचे अहवाल निगेटिव्ह आल्यानंतरच संस्थेत फेरदाखल केलेले असल्याने सदर प्रकरणी चौकशीची आवश्यकता नाही.
(३) राज्यातील बालगृहातील प्रवेशिताना कोरोनाची बाधा होऊ नये म्हणुन लसीकरण, आजारी बालकांसाठी विशेष पोषण, ॲम्बुलन्स सेवा, औषधे, अत्यावश्यक वैदयकीय चाचण्या, सॅनिटायझर, साबण, मास्क तसेच सदयस्थितीत बालकांच्या काळजी साठी कार्यरत असणाऱ्या संस्थेत राहणाऱ्या बालके जे असाध्य/गंभीर आजार जसे HIV, कर्करोग, क्षयरोगाने ग्रस्त असतील अश्या बालकांना वैदयकीय सुविधा आणि अतिरीक्त पोषण सहाय्य पुरविणे तसेच सोशल डिस्टसिंगचे महत्व पटवून दिले, वैयक्तीक स्वच्छता, नियमित हात धुणे याबाबत समुपदेशन करण्यात आले. कोरोनाशी संबंधित अति तातडीच्या वापरासाठी बाल न्याय निधीतुन सर्व जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.